Get Printed Study Notes for UPSC Exam - https://iasexamportal.com/notes

Civil Services (Main) Examination, 2024

**PHKM-C-MRTH**

# मराठी / MARATHI

## ( अनिवार्य ) / ( Compulsory )

| | |
|---|---|
| वेळ : तीन तास<br>Time Allowed : **Three Hours** | कमाल अंक : **300**<br>Maximum Marks : **300** |

---

### प्रश्नपत्रिकेशी संबंधित सूचना

***प्रश्न सोडविण्यापूर्वी पुढीलपैकी प्रत्येक सूचना काळजीपूर्वक वाचा :***

*सर्व प्रश्न सोडवायचे आहेत.*

*प्रश्नाचे गुण त्या त्या प्रश्नासमोर दिलेले आहेत.*

*प्रश्नामध्ये वेगळा निर्देश केलेला नसेल तर प्रश्नांची उत्तरे **मराठीत** (देवनागरी लिपीमध्ये) लिहावयाची आहेत.*

*जेथे जेथे शब्दसंख्येची मर्यादा प्रश्नामध्ये सांगितलेली असेल, तेथे तिचे पालन केलेच पाहिजे. सांगितलेल्या शब्दसंख्येपेक्षा खूप जास्त अथवा खूप कमी शब्दांत उत्तर लिहिलेले असल्यास गुण कमी केले जाऊ शकतात.*

*प्रश्न-उत्तर पुस्तिकेतील कोणतेही पृष्ठ कोरे सोडल्यास त्यावर स्पष्टपणे काट मारावी.*

### Question Paper Specific Instructions

***Please read each of the following instructions carefully before attempting questions :***

*All questions are to be attempted.*

*The number of marks carried by a question is indicated against it.*

*Answers must be written in **MARATHI** (Devanagari script) unless otherwise directed in the question.*

*Word limit in questions, wherever specified, should be adhered to and if answered in much longer or shorter than the prescribed length, marks may be deducted.*

*Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.*

---



Download FREE UPSC E-BOOKS FREE! CLICK HERE

Get Printed Study Notes for UPSC Exam - https://iasexamportal.com/notes

**Q1.** **पुढीलपैकी कोणत्याही *एका* विषयावर 600 शब्दांत निबंध लिहा :** ***100***

(a) लोकशाही आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य

(b) भारतापुढील पिण्याच्या पाण्याचे संकट

(c) आदिवासी संस्कृतीचे जतन : प्रयत्न आणि शक्यता

(d) रिकाम्या भांड्याला खळखळाट फार

**Q2.** **पुढील उतारा काळजीपूर्वक वाचा आणि उताऱ्याच्या शेवटी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे सुस्पष्ट, योग्य व संक्षिप्त भाषेत लिहा :** ***12×5=60***

समीक्षा साहित्याचे एक अंग मानले जाते, ते यासाठी की ती साहित्याला आपल्या मर्यादेत ठेवण्याची व्यवस्था करते. जेव्हा साहित्यात अशी गोष्ट समाविष्ट होते तेव्हा त्याच्या आस्वादास ती बाधक ठरते. यातूनच साहित्यात दोष निर्माण होतो, ज्याप्रमाणे संगीतातील बेसूर ध्वनी संगीताला दूषित करून जातो.

आनंद आपल्या खऱ्या भावनांच्या अभिव्यक्तीमध्ये आहे. खोट्या भावनांमध्ये माणसाला फक्त दु:खच मिळते. असेही होऊ शकते की एखाद्याला खोट्या भावनांमध्येही आनंद मिळू शकतो. काही लोकांना हिंसा करून किंवा कोणाचे धन चोरून किंवा आपल्या स्वार्थासाठी कोणाचे अहित करून सुद्धा आनंद प्राप्त होऊ शकतो; परंतु ही मनाची नैसर्गिक प्रवृत्ती नाही. चोराला प्रकाशापेक्षा अंधार अधिक प्रिय असतो, परंतु त्यामुळे प्रकाशाच्या श्रेष्ठतेत बाध्यता येत नाही.

ज्या भावनांमुळे आपण दुसऱ्याच्या जवळ जाऊ शकतो, त्याच भावना खऱ्या असतात. प्रेम आपल्याला इतरांशी जोडते आणि अहंकार आपल्याला वेगळे करतो. जी व्यक्ती खूप अहंकारी आहे, ती इतरांसोबत कशी वागेल ? म्हणून प्रेम हा खरा स्वभाव आहे आणि अभिमान हा खोटा आहे.

Download FREE UPSC E-BOOKS FREE! CLICK HERE

Get Printed Study Notes for UPSC Exam - https://iasexamportal.com/notes

भक्ती व्यक्त करण्यासाठी काही मूर्त वस्तूची आवश्यकता असते. दया दाखविण्यासाठी आम्हाला कोणाचीतरी आवश्यकता असते. संयम आणि धैर्य दाखविण्यासाठी पुन्हा आम्हाला कोणाचीतरी आवश्यकता आहे. याचा अर्थ आपल्या भावनांना जागृत ठेवण्यासाठी आपल्याला बाह्य वस्तूंशी सुसंवादी असण्याची गरज आहे. बाह्य नैसर्गिक जगाचा आपल्यावर काहीही परिणाम होत नाही; जर पुत्रशोकाने रडत असलेल्या व्यक्तीला पाहून आपल्या डोळयांतून अश्रू ढळत नसतील, जर आपण कोणाच्या आनंदोत्सवात सहभागी होऊन आनंदीत होऊ शकत नसूत असे आपल्याला आढळून आले तर आपण निर्वाण अवस्थेला पोचलो आहोत, हे समजायला हवे. अशा अवस्थेसाठी साहित्याचे काही मूल्य नाही. खरा साहित्यिक तोच असतो जो जगाच्या सुखदु:खाने सुखी वा दु:खी होतो, आणि दुसऱ्यांमध्ये सुख-दु:खाची निर्मिती करू शकतो. स्वत:च दु:खाचा अनुभव घेणे पुरेसे नाही. कलावंतामध्ये त्याला आविष्कृत करण्याची क्षमता सुद्धा असायला हवी. परंतु भिन्न परिस्थितीमुळे व्यक्तीला भिन्न दिशा प्राप्त होतात. मनुष्यात भावनांची समानता असूनही परिस्थितीतील फरक त्यांच्या प्रतिसादावर परिणाम करतो. जर आपण शेतकऱ्यांमध्ये रहात आहोत किंवा त्यांच्यासोबत थांबण्याची संधी घेत आहोत, तर स्वाभाविक त्यांच्या सुखदु:खांना आपले सुखदु:ख समजू लागतो. त्यासोबतच आपण आपल्या भावनांच्या तीव्रतेप्रमाणे प्रभावित होतो. याप्रमाणे इतर परिस्थितीही समजून घ्यायला हवी. याचा अर्थ असा लावत असाल की एखादी विशिष्ट व्यक्ती शेतकऱ्यांचा, मजुरांचा किंवा चळवळीचा प्रचार करण्यासाठी हे करीत आहे, तर ते अन्यायकारक ठरेल. साहित्य आणि प्रचार यामध्ये काय फरक आहे ? प्रचारात स्वत:ची जाहिरात नसली तरीही विशिष्ट उद्देश पूर्ण करण्याची उत्सुकता असते, जी साधनांच्या वैधतेबद्दल काळजी करीत नाही. साहित्य हे थंड आणि सौम्य वाऱ्याची झुळूक आहे, जी प्रत्येकाला शांत आणि आनंदित करते. प्रचार हे एक वादळ आहे, जे हिरव्यागार वृक्षांना उखडून टाकतात आणि झोपड्या व महाल या दोघांनाही हादरवून सोडतात. प्रचार हा रसहीन असल्यामुळे तो आनंद देऊ शकत नाही, परंतु एखादा कलावंत त्यात सौंदर्य आणि रस निर्माण करण्यात यशस्वी झाला तर तो प्रचाराचा विषय होण्याऐवजी चांगल्या साहित्याचा भाग बनतो.

(a) समीक्षा हा साहित्याचा भाग का मानला जातो ? *12*

(b) खरी आणि खोटी अभिव्यक्ती म्हणजे काय ? *12*


(c) मनाची कोणती स्वाभाविक प्रवृत्ती नाही ? *12*

(d) लेखकाच्या मते कोण खरा साहित्यिक होऊ शकतो ? *12*

(e) साहित्य आणि प्रचार यात काय फरक आहे ? *12*








**CLICK LINK FOR STUDY NOTES :**

https://iasexamportal.com/study-kit/upsc-complete-study-material

Get Printed Study Notes for UPSC Exam - https://iasexamportal.com/notes

**Q3. पुढील उताऱ्याचा अंदाजे एक-तृतीयांश शब्दांत सारांश लिहा. उताऱ्याला शीर्षक देऊ नये. सारांश मराठीत लिहा.** ***60***

हे लक्षात घेणे आवश्यक आहे की मत्सर हा एखाद्या व्यक्तीच्या विशेषत्वातून निर्माण होत असतो. केवळ श्रीमंत, सद्गुणी किंवा आदरणीय अशा कोणाचाही आपल्याला हेवा वाटतो असे नाही. मत्सर तेव्हाच उद्भवतो जेव्हा आपण असा विश्वास करतो की इतरांशी आपली तुलना केली जाते किंवा आपली तुलना काही विशिष्ट व्यक्तींशी केली जाते. आपल्यापासून दूर असल्यामुळे ज्यांच्याकडे लोकांचे लक्ष जाऊ शकत नाही, त्यांच्याबद्दल आपल्या मनात मत्सर निर्माण होत नाही. काशीत राहणाऱ्या कोणत्या श्रीमंत माणसाला युरोपमध्ये राहणाऱ्या कोणत्या श्रीमंत माणसाबद्दल ऐकून मत्सर वाटणार नाही. हिन्दीतील कोणत्या कवीला इंग्रजीतील कोणत्या कवीचे महत्त्व ऐकून मत्सर वाटणार नाही. नातेवाईक, बालमित्र, सहाध्यायी आणि शेजारी यांच्यात मत्सर अधिक असल्याचे पहायला मिळते. बालपणापासून एकत्रित असणाऱ्या आणि एकत्रित वावरणाऱ्यांमध्ये सुद्धा एखाद्याची पदोन्नती झालेली पाहून देखील हेवा निर्माण होतो. आपल्या साथीदारांपैकी कोणी उच्चपदाला पोहोचला, तर तो या दृष्टीने पाहतो की दुसरा कोणी या पदावर पोहोचू नये. याचा अर्थ आपल्या हितशत्रूंचा शोध घेत लोक आपल्या जुन्या मित्रांपर्यंतही पोचत असतात. अशावेळी या संसर्गसूत्रात गुंतल्याने आपण अन्य व्यक्तीलाही याच पंक्तीत आणून उभे करतो. अशावेळी सहानुभूती, सहाय्यता इत्यादी भावनांचा आदर करणाराही हेवा आणि द्वेष यांच्या मागे लागू शकतो. आपल्या एखाद्या वक्तव्याने चांगुलपणाची संभावना नाकारून भविष्यातील संकटांची बाधा निर्माण करता कामा नये. भविष्य अनिश्चित, अजय आणि अटळ असते, त्यामुळे आपण शुद्ध बुद्धीपासून ढळता कामा नये. एवढेच नव्हे तर आपण आपल्या सर्व ज्ञानाने आणि बुद्धीनेही त्यावर पूर्णपणे मात करू शकत नाही.

आता महत्त्वाची गोष्ट अशी आहे की मत्सराच्या क्षेत्रात ईर्ष्यायुक्त व्यक्ती आणि अभिलाषाशिवाय या गतिशीलतेकडे लक्ष देणारा समाज देखील आवश्यक आहे. समाजाच्या धारणांवर प्रभाव टाकण्याच्या गरजेतून मत्सर निर्माण होतो. समृद्धी, सद्गुण आणि आदर हे समाजाला न कळवता केवळ खाजगीरित्या वैयक्तिक समाधानासाठी आणि आनंदासाठी नसतात. जरी आपण प्रत्यक्षात श्रीमंत नसलो किंवा इतरांसारखे सद्गुणी नसलो, परंतु समाज आपल्याला त्यांच्या समान किंवा त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ समजत असेल, तर आपण समाधानी राहू आणि मत्सराच्या तीव्र वेदनांनी ग्रासले जाणार नाही. हे विलक्षण आहे की एखादी गोष्ट मिळवण्यात अयशस्वी राहूनही केवळ सामाजिक धारणेमुळेच आपल्याला समाधान मिळते. मत्सर हे सामाजिक अस्तित्वाच्या कृत्रिमतेतून जन्मलेले विष आहे. त्याच्या प्रभावाखाली आम्ही दुसऱ्याच्या प्रगतीमुळे आपली वास्तविकता न पाहता अनावश्यक दु:खी होतो.



Download FREE UPSC E-BOOKS FREE! CLICK HERE

Get Printed Study Notes for UPSC Exam - https://iasexamportal.com/notes

न्यायमूर्ती न्याय करतात, गवंडी विटा रचतो. न्यायमूर्तींनी विटांचे काम करणाऱ्या गवंडयाला आपल्यापेक्षा लहान आहे असे समजणे सामाजिक दृष्टीने योग्य होणार नाही. ज्या समाजात अशी श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची भावना निर्माण होऊन अभिमान दृढ होत जातो, त्या समाजातील भिन्न-भिन्न वर्गामध्ये कायमस्वरूपी मत्सराची भावना स्थिर होते आणि सामुदायिक शक्तीचा विकास फार कमी प्रसंगी पहायला मिळतो. जर समाजातील भिन्न-भिन्न समुदाय सामाजिक कार्यात कार्यरत असतील, तर आपापसात श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची शेखी मिरवू नये. उलट समाजातील विविधतेचा स्वीकार करावा, म्हणजे समाजातील बराचसा असंतोष दूर होऊ शकतो. जेथे असा श्रेष्ठ-कनिष्ठत्वाचा अधिक प्रचार असतो आणि तो जीवनव्यवहारात स्पष्टपणे दिसायला लागतो; तेव्हा लोकांची ऊर्जा काही विशेष ठिकाणी प्रवृत्त होऊन तेथे संघटित होऊ लागते आणि सामाजिक कार्यात विषमता निर्माण होते.

*(शब्दसंख्या 428)*

**Q4. पुढील उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर करा :** ***20***


कुटीर उद्योग आणि लघुउद्योगांची चर्चा आज भारतात पुन्हा जोर पकडू लागली आहे. या उद्योग-धंद्यांच्या मुळाशी अशा घरगुती कामधंद्यांची कल्पना आहे की जे लहानशा जागेवर कमी पैशात आपला व्यवसाय स्थापित करून उत्पादनाचा भागीदार बनू शकतात आणि आपल्या उपजीविकेचा प्रश्न सोडवू शकतात. बेकारीशी लढा देवून सामान्य स्तरावर आपले जीवन जगू शकतात. भारतासारख्या देशासाठी असे लघुउद्योग उपयोगाचे ठरू शकतात, ही बाब महात्मा गांधींना स्वातंत्र्य संग्रामाच्या दिवसातच लक्षात आली होती. त्यांनी स्वतंत्र भारतात अशाच लहान उद्योगांच्या घटकांची स्थापना करण्यास आणि पारंपरिक उद्योगांचे नूतनीकरण करण्याची प्रेरणा दिली होती. मात्र स्वातंत्र्यानंतर आपल्या नेतृत्वाने जाणीवपूर्वक याकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे येथे अनेक मोठे उद्योगधंदे फोफावले आणि ती संपन्न वर्गाची वैयक्तिक मालमत्ता बनली. दुसरीकडे वाढती लोकसंख्या आणि शिक्षणाचा प्रचार, जागृती, अधिकारांची मागणी आणि मान्यता, सतत वाढत चाललेली बेकारांची संख्या या सगळ्यांनी आजच्या जागृत चिंतकांना हतबल केले की उशिरा का होईना परंतु देशातील या प्रकारच्या समस्या सोडविण्यासाठी गांधीवादी सूत्रांचा स्वीकार करा, की ज्यामुळे येथील समस्यांची पूर्तता होऊ शकते. परिणामस्वरूप आज देशात गरजेप्रमाणे लघु उद्योगांचे जाळे पसरू लागले आहे.



Download FREE UPSC E-BOOKS
FREE!
CLICK HERE

# IAS MAINS G.S.
# SOLVED PAPERS

- **Medium:** English
- **Pages:** 750+
- **PDF File Download Link via Email**




PDF

CLICK HERE

100% SAFE

**CLICK LINK FOR EBOOK :**

https://iasexamportal.com/ebook/upsc-mains-general-studies-solved-papers

Get Printed Study Notes for UPSC Exam - https://iasexamportal.com/notes

**Q5.** **पुढील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा :** ***20***

In our democratic system, the press has a vital role. While there has been large-scale expansion of the print and visual media in recent years, a focused approach to dealing with major societal and political issues has still to evolve. There is, as yet, excessive and exaggerated coverage of exposures and scandals and far too little well-informed comment or analysis of the various deep-rooted factors which generate the continuing malaise. The media could make an extremely useful contribution by devoting adequate coverage to tasks well done, highlighting the achievements of honest and efficient public servants and organizations, according special attention to developments in the remote and backward areas of our country. Our media is free and unfettered. It should be able to expose cases and incidents involving irregular and unlawful exercise of authority and abuses of all kinds. The existing ills in our socio-political environment will, on present reckoning, take considerable time to remedy. The Department of Personnel and Administrative Reforms should focus on establishing institutions responsible for all personnel matters — appointments, postings, transfers etc. — without any external interference. Also, there is a need for adoption of a robust code of ethics to be followed by those involved in public functioning.

**Q6.** **(a)** **पुढील वाक्‌प्रचारांचा/म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :** ***2×5=10***

(i) हातावर तुरी देणे *2*

(ii) वारा पाहून पाठ फिरवणे *2*

(iii) आस लावणे *2*

(iv) खीळ घालणे *2*

(v) टेंभा मिरवणे *2*



Download FREE UPSC E-BOOKS FREE! CLICK HERE

Get Printed Study Notes for UPSC Exam - https://iasexamportal.com/notes

**(b)** **पुढे दिलेल्या कल्पनांचा 10 वाक्यांत विस्तार करा :** *5×2=10*

(i) रुग्णसेवा हीच देशसेवा *5*

(ii) थेंबे थेंबे तळे साचे *5*

**(c)** **पुढे दिलेल्या विषयावर 20 वाक्यांचा संवाद लिहा :** *10*

पर्यावरणाचे महत्त्व

**(d)** **पुढे दिलेल्या शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :** *1×5=5*

(i) व्योम *1*

(ii) नीरज *1*

(iii) सौदामिनी *1*

(iv) प्रघात *1*

(v) सहोदरा *1*

**(e)** **पुढे दिलेल्या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :** *1×5=5*

(i) अबोल *1*

(ii) अभ्राच्छादित *1*

(iii) वियोग *1*

(iv) शेष *1*

(v) सुचिह्न *1*




Download FREE UPSC E-BOOKS
FREE!
CLICK HERE

# UPSC Mains Exam

## Practice Answer Sheet Booklet and Tips

- Medium: English
- Pages: 200+
- PDF File Download Link via Email
















**FREE PRACTICE BOOKLET EBOOK :**

https://iasexamportal.com/ebook/practice-booklet-for-upsc-ias-mains-exam